नैमित्तिक रजेच्या मागे व पुढे रविवार
आणि सार्वजनिक सुट्ट्या जोडून घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग
निर्णय क्रमांक एलव्हीई १४८२ : सीआर १०-एसईआर -९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक २४ मार्च १९८२.

## शासन निर्णय

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक एलव्हीई १४८१ सीआर २७४ एसईआर -९ दिनांक २० मार्च १९८१ अन्वये नैमित्तिक रजेच्या मागे आणि/किंवा पुढे कितीही रविवार आणि किंवा सार्वजनिक सुट्ट्या जोडून घेण्याची तसेच नैमित्तिक रजेच्यामध्ये येणाऱ्या एक किंवा अधिक सुट्ट्या नैमित्तिक रजांना जोडून घेण्याची जी परवानगी दिलेली होती ती आता कायम स्वरूपात चालू ठेवण्याचा शासन आदेश देत आहे. तथापि, एका वेळी नैमित्तिक रजा व सुट्ट्या मिळून होणारा एकूण कालावधी सात दिवसांहून अधिक होता कामा नये व अपवादात्मक परिस्थितीतच केवळ ही मर्यादा दहा दिवसांपर्यंत वाढवून देण्याबाबतची पूर्वीची शर्त तशीच कायम राहील.

२ या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

श्य. दे. पानसे,
शासनाचे उप सचिव.

-०-

क्रमांक आस्थापना ३-६७-३८३२
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
रत्नागिरी २९-९-१९८२.

प्रत : १) विशेष मुद्रांक अधिकारी, रत्नागिरी, दापोली.
२) उपविभागीय अधिकारी दापोली, चिपळूण, रत्नागिरी
३) तहसिलदार सर्व
४) जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व शाखा यांजकडे माहितीसाठी रवाना.

O.C. signed by R.D.C. ता. २९-९

जिल्हाधिकारी रत्नागिरी करिता.